| MHSN110008672025 | नियमित दिवाणी दावा क्र.१९२/२०२५<br>सयद अब्दुल रज्ज़ाक / राहुल शिंदे |
|---|---|

## निशाणी १२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्तीकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दिलेला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले आहे की, दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.२ हिने प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकतीबाबत दिनांक १३/०८/२०२५ रोजी दस्त क्र.२३५७/२२०२५ नोंदवलेला आहे. त्यामुळे दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र.२ हिचे नावास काट मारुन प्रतिवादी क्र.२ यांना दाव्यातून वगळणे आवश्यक झालेले आहे व त्या अनुषंगाने दुरुस्ती करणे आवश्यक झालेले आहे. सदर दुरुस्तीने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी १४ येथे म्हणणे देवून असे नमूद केले आहे की, अर्ज व त्यातील मजकूर खोटा आहे. वादीने मागितलेली दुरुस्ती ही वादीला मागता येत नाही. सदरची दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची नसून त्यामुळे दाव्यात बदल होत आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा. परंतु अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादी प्रतिवादी क्र.१ यांची कोणतीही हरकत नाही.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा डिक्लेरेशन व निरंतर ताकीदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही औपचारीक स्वरुपाची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदरची दुरुस्ती ही दाव्याच्या अंतिम निवाड्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दाव्यामध्ये पुढील तारखेच्या आत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत द्यावी अन्यथा योग्य ते आदेश करण्यात येतील.

३. सहा. अधीक्षक यांनी दावा रजिष्टरमध्ये दुरुस्तीची नोंद घ्यावी.

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.03.07 17:23:59 +0530

आटपाडी. प्र. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

दिनांक : ०७/०३/२०२६ आटपाडी

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 07/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 07/03/2026 |
| Order uploaded on | : | 07/03/2026 |